# लंडन - भाग ५

गमालीए त्याच्या वकिलासमोर बसला होता. त्याच्या मृत्यूपत्रात तो गेल्यावर पुढची पाच वर्ष गरिबांना अन्न, इंधन आणि पैसे मिळतील अशी तजवीज त्याने करुन ठेवली होती. वकील आश्चर्याने त्याच्याकडे पाहत होता. त्याच्या डोळ्यातले भाव ओळखत गमालीए म्हणाला " सर.. तरुणपणी नॉर्दम्पटनशायरहून लंडनला मी आलो तेव्हा माझ्याकडे काहीही नव्हतं. माझ्या घरच्यांनी मला वेड्यात काढलं.. पण मी कोणाकडून तरी ऐकलं होतं..'city air makes you free' मी गावातून आलो . मेहनत केली पण लंडनने मला मोठं केलं.. श्रीमंत केलं मला... इतकं .. की व्यापारी संघाचा अध्यक्ष झालो. आता परतफेड तर केली पाहिजे" वकिलाच्या डोळ्यातल्या कुतूहलाची जागा आता आदरानं घेतली. अश्याच प्रकारे आपल्या व्यापार उद्योगांमुळे लंडन हे कितीतरी लोकांना आकर्षित करत होतं. त्यांचं भविष्य घडवत होतं.

ट्युडर राजघराण्याची सत्ता इंग्लंडवर असताना आठव्या हेन्री या राजाने त्याच्या कारकिर्दीत इंग्लिश आरमार उभारलं. 1534 साली प्रोटेस्टंट धर्म स्वीकारला आणि इंग्लंडला रोमच्या जोखडातून मुक्त केलं. चर्च ऑफ इंग्लंडची स्थापना झाली. पण इंग्लंडची सर्वार्थानं वाढ झाली ती राणी एलिझाबेथच्या काळात. ही पहिली एलिझाबेथ. सोळाव्या शतकात ती जेव्हा सत्तेत आली तेव्हा युरोपियन रेनेसॉचा काळ होता. सर्व कला, शास्त्र यांत नवे बदल होत होते. इतर युरोपियन साम्राज्यांची नव्या नव्या वसाहती करायला सुरुवात झाली होती. इंग्लिश आरमारही या काळात शक्तिशाली बनलं. इंग्लंडच समुद्रावरील वर्चस्व वाढत गेलं. नवेनवे प्रदेश शोधून इंग्लिश वसाहती करण्यास चालना मिळाली. त्यातून व्यापार वाढत गेला आणि 1600 साली ईस्ट इंडिया कंपनी स्थापन झाली. इंग्लंडच्या साम्राज्यशाहीला सुरुवात झाली. लंडन वाढत गेलं. सुबत्ता आली. मनोरंजन आलं. शेक्सपियर सारखे नाटककार या काळात उदयाला आले. युध्द, आक्रमणे न झाल्याने पहिल्या एलिझाबेथच्या सत्तेत इंग्लंड शांतपणे प्रगती करु शकले.

राणीनंतर पहिला चार्ल्सची कारकीर्द खळबळ जनक होती. त्याने सत्तेच्या धुंदीत पार्लमेंट बरखास्त करुन टाकलं. तेव्हा ऑलिव्हर क्रॉमवेलच्या नेतृत्वाखाली इंग्लिश जनतेने त्याच्याविरुद्ध बंड पुकारलं. क्रॉमवेल जिंकला आणि चार्ल्सचा शिरच्छेद करण्यात आला. इंग्लिश स्वभावाची गंमत म्हणजे त्यांनी आपल्या राजाला.. म्हणजे पहिल्या चार्ल्सला मारलं तरी त्याचा पुतळा मात्र त्यांनी शहरात उभारला आहे.. पुढची अकरा वर्ष क्रॉमवेलच्या कंटाळवाण्या कारकिर्दीत लंडनमधील कलांवर बंदी आली. फक्त रुक्ष व्यवहार उरले. धर्माला महत्व आलं. क्रॉमवेलनंतर दुसरा चार्ल्स गादीवर आला. एवढया काळात लंडनची लोकसंख्या झपाट्यानं वाढली लोकांना राहायला जागेची टंचाई निर्माण

# लंडन - भाग ५

झाली. घरं उंच होऊ लागली. गर्दी वाढली. तशात 1665 साली प्लेगची भयंकर साथ आली व त्यात लंडन मधली निम्मी लोकसंख्या बळी पडली.

लगेच पुढच्या वर्षी 1666 मधे सिटीमधल्या पुडिंग लेन मधल्या पावाच्या बेकरीला आग लागली. रात्री एकची वेळ. वारा सुटला होता. जवळपास तेल, फटाके इत्यादींची गोदामे होती. वाऱ्याने ती आग या गोदामात पसरत गेली.. शहरभर वणवा पेटला. त्यात जवळपास सगळं लंडन जळून भस्मसात झालं. हिच ती 'द ग्रेट फायर ऑफ लंडन'. आज पुडिंग लेन मधे तिचा स्मृतीस्तंभ उभा आहे. यानंतर मात्र लंडन आमूलाग्र बदललं. सिटी बाहेर लंडन वाढू लागलं. बांधकामांना वेग आला. अठराव्या शतकात एका मागोमाग एक असे चार जॉर्ज राजे गादीवर आले.. त्यांचा कालखंड संपल्यावर... 1837 साली आणखी एक विलक्षण व्यक्तिमत्व राज्यावर येणार होतं आणि इंग्लंड व पर्यायाने लंडनच नाव जगाच्या इतिहासात कायमचं कोरलं जाणार होतं... त्याबद्दल लंडनच्या जडणघडणीच्या पुढच्या भागात आणि शेवटच्या भागात.